# Newspaper: Maharashtra Times

# Article Date: 22nd August 2018

# Article regarding Enigma Escapade 2018 (Pre Event Article)

## विद्यार्थ्यांनी फेकले 'सीड बॉम्ब'

**पोदारच्या विद्यार्थ्यांनी अलीकडेच बॉम्ब फेकले. अहं...लगेच दचकू नका. हे बॉम्ब नुकसान करणारे नव्हते, तर उलट आपल्या फायद्याचेच होते. त्यांच्या 'एनिग्मा' फेस्टच्या निमित्तानं, त्यांनी अलीकडेच 'सीड बॉम्ब'चा वर्षाव केला. म्हणजे, त्यांनी नेमकं केलं तरी काय?**

**पोदारमध्ये रंगणार 'एनिग्मा' फेस्टिव्हल**

मेघना अभ्यंकर, कॉलेज क्लब रिपोर्टर
muntainbox@gmail.com

'सीड बॉम्ब' म्हणजे नेमकं काय असा प्रश्न तुम्हालाही पडला असेल. तर, पोदार कॉलेजच्या विद्यार्थ्यांकडे होते हे 'सीड बॉम्ब'. झाडं लावण्यासाठी त्यांनी हे सीड बॉम्ब तयार केले होते. पोदार कॉलेजमध्ये येत्या २३ ते २६ ऑगस्ट दरम्यान 'एनिग्मा' फेस्टिव्हल रंगणार असून, या फेस्टिव्हलआधी कॉलेजिअन्सनी वेगवेगळ्या प्रकारचं समाजकार्य केलं. हे 'सीड बॉम्ब' हा त्याचाच एक भाग होता. पर्यावरण रक्षण संकल्पनेअंतर्गत 'एनिग्मा एस्केप्ड' ही थीम घेण्यात आली आहे. 'महाराष्ट्र टाइम्स' या फेस्टिव्हलचा मीडिया पार्टनर आहे.

प्लास्टिक बंदीविषयी जनजागृती करण्यासाठी विद्यार्थ्यांनी पथनाट्यं तयार केली असून ती सादर केली. प्लास्टिक पिशव्यांना पर्याय म्हणून कागदाच्या पिशव्या तयार करून कॉलेजच्या जवळपासच्या परिसरात त्यांनी त्या मोफत वाटल्या. मुक्या प्राण्यांवर प्रेम करा हा संदेश देण्यासाठी प्राण्यांसाठी चालवल्या जाणाऱ्या एका प्राणी रूग्णालयामध्ये हे विद्यार्थी गेले होते. तिथे जखमी प्राण्यांवर उपचार करण्यात त्यांनी डॉक्टरांना मदत केली. पालघर जिल्ह्यातल्या वज्रेश्वरी गावामधल्या एका शाळेत पोदारच्या विद्यार्थ्यांनी शालेय साहित्याचं वाटप केलं. पर्यावरणाचा होणारा ऱ्हास, जैवविविधतेवर पडत असलेला घाला रोखण्यासाठी संदेश देण्याचा प्रयत्न हे विद्यार्थी करणार आहेत.



**कसा बनतो सीड बॉम्ब?**

पर्यावरण रक्षणासाठी एक पाऊल म्हणून या विद्यार्थ्यांनी वृक्षारोपण करायचं ठरवलं. त्यासाठी त्यांनी सीड बॉम्बची मदत घ्यायचं ठरवलं. माती, खत आणि शेण एकत्र करून त्यात झाडाचं बी टाकलं जातं. त्याला 'सीड बॉम्ब' म्हणतात. फेस्टिव्हलपूर्वी हाती घेतलेल्या समाजकार्याचा एक भाग म्हणून त्यांनी ते स्वतः तयार केले. जुलै महिन्यामध्ये सारसगडावर ट्रेकला गेलेले असताना त्यांनी ते गडाच्या परिसरात फेकले. एरव्ही जेव्हा बिया टाकल्या जातात तेव्हा त्यातून रोपटं उगवण्याची शाश्वती नसते. पण सीड बॉम्बमध्ये मात्र माती, खत असल्यानं रोपटी उगवण्याची शक्यता वाढते असं या विद्यार्थ्यांनी सांगितलं.

चार दिवस चालणाऱ्या या फेस्टिव्हलमध्ये जवळपास ६० इव्हेंट्स होणार आहेत. फोटोग्राफी, शॉर्टफिल्म यासारख्या इव्हेंट्सच्या बरोबरीनं मराठी संस्कृती, कलागुण यांना प्रोत्साहन देणारा 'ऋतुरंग' उत्सव होणार आहे. फोटोग्राफी, शॉर्टफिल्म, लेखन, नृत्य स्पर्धा याबरोबरच कबड्डी स्पर्धा हेही 'एनिग्मा'चं विशेष आकर्षण आहे.